मान्यतेस सविनय सादर,

दक्षिणापेटीतील रक्कम मोजणीचे काम आठवडयातून साधारणत: दोनदा केले जाते. दक्षिणा मोजणीच्या वेळी नोटां/नाण्यांची जलद व अचुक मोजणी करण्यासाठी संस्थानकडे सध्या खालीलप्रमाणे मशिन्स कार्यान्वित आहेत.

| अ.क्र. | मशिनचा तपशील | नग |
|---|---|---|
| १ | बंडल नोट काऊटींग मशीन | ३ नग |
| २ | लुज नोट काऊटिंग मशीन (ST 350) | ४ नग |
| ३ | कागद फाडणे (पेपर श्रेडर) मशीन (E2326C) | २ नग |
| ४ | कॉईन सॉर्टिंग ॲण्ड काऊटींग मशीन (Mach 6) | १ नग |

सदर मशिनच्या दुरूस्ती व देखभालीसाठी सन २०२३-२४ (एप्रिल-२०२३ ते मार्च-२०२४) या कालावधीकरीता, वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टकरीता (AMC) करणेकामी दिनांक ०१.०३.२०२३ ते दिनांक०९.०३.२०२३ या कालावधीत अटी-शर्ती व दरपत्रके मागणी फॉर्म संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर (www.sai.org.in) प्रसिद्ध करुन दरपत्रके मागणी करण्यात आली होती.

तथापि, सदर मुदतीत एकही दरपत्रक प्राप्त झालेले नाही. म्हणून सुधारीत खरेदी नियमातलीतील ४.४.३.१ चे तरतुदीनुसार दिनांक १०.०३.२०२३ ते दिनांक १८.०३.२०२३ पर्यंत अशी एक आठवड्याची (सुट्ट्या वगळून) मुदतवाढ द्यावी लागेल.

तरी, वरील प्रस्तावित केल्याप्रमाणे, दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणीकरीता वापरात असलेल्या मशिन्सचे, वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) कामी सन २०२३-२४ (एप्रिल-२०२३ ते मार्च-२०२४ अखेर) या कालावधीसाठी दरपत्रके मागणीस दिनांक १०.०३.२०२३ ते दिनांक १८.०३.२०२३ पर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेकामी सविनय सादर.

10/3

(के.एस.खराडे)
लेखाधिकारी तथा मुख्य लेखाधिकारी